गुरूवार, दि. १७ नोव्हेंबर, २०२२

## आझादी का अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत मराठी विभाग आयोजित
## प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला
## विषय – प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांची शिक्षणविषयक दृष्टी
### वक्ते – मा. प्रा. सचिन गरूड

### अहवाल

''महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांनी समाजातील मानवी सबंध वेगळ्या अंगाने विकसित केले. समाज बदलायचा असेल तर सर्वात आधी माणूस बदलणे गरजेचे आहे. माणसामध्ये आत्मभान जागृत करायचे असेल तर त्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे हे ओळखून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सारख्या युगपुरुषांनी शाळा-महाविद्यालयांची स्थापना केली. कर्मवीर अण्णांच्या मुशीत वाढलेल्या एन. डी. पाटील यांनीही सातत्याने दलित, वंचित आणि तळाच्या मुलांचा विचार सतत केला. १९७२ च्या दुष्काळाच्या लढ्यात एन. डी. पाटील यांनी दुष्काळग्रस्त मुलांना विद्यावेतन मिळावे, त्यांची फी माफ व्हावी, दुष्काळग्रस्त प्रदेशातील शाळा जगल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न केला.'' असे मत प्रा. सचिन गरूड यांनी व्यक्त केले. रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे. के. (बापू) जाधव होते.

जे. के. (बापू) जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या व्याख्यानात गरुड पुढे म्हणाले, ''नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये स्त्रियांना व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारस्थान रचले जात आहे. कौशल्य विकसनाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना कामगार बनवण्याकडे कटाक्ष आहे. आज प्रा. एन. डी. पाटील हयात असते तर त्यांनी निश्चितच या नव्या शैक्षणिक धोरणास विरोध केला असता.''

अध्यक्षीय मनोगतात जे. के. जाधव म्हणाले, ''एन. डी. पाटील यांनी कर्मवीर अण्णांच्या विचारांना पुढे चालतवत रयत शिक्षण संस्था खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवली.'' यावेळी प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी प्रास्ताविक व भूमिका कथन केले. पाहुण्यांची ओळख डॉ. स्वाती मगदूम, आभार प्रा. दिलीप कोने यांनी व्यक्त केले. तर सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** 84

व्याख्यानमालेची काही क्षणचित्रे पुढील पानावर ...

## काही क्षणचित्रे....

**विषय** –प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी महाराष्ट्राला काय दिले **वक्ते** – मा. प्रा. सचिन गरुड












विभागप्रमुख
मराठी विभाग
मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली

प्र. प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)
प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), जि. सांगली.